# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.12.2025** **वारःरविवार**

---

1. आसाममध्ये पंतप्रधानांच्या हस्ते आज खत प्रकल्पाचे उद्घाटन आणि विद्यार्थ्यांसोबत संवाद
2. करुणा, सुसंवाद, परस्पर आदर ही मूल्ये बळकट, सुसंवादी आधुनिक जगाचा पाया असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
3. महाराष्ट्रात 23 नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांच्या मतदानाची अंतिम आकडेवारी आज जाहीर होणार. आजच मतमोजणी.
4. नागरिकांना स्वभाषेत निकाल उपलब्ध होण्यासाठी संवैधानिक संस्थांनी संविधान भावनेने काम करावे - सरन्यायाधीशांचे प्रतिपादन आणि
5. BWF वर्ल्ड टूर फायनल्स 2025 स्पर्धेत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीला कास्यपदक

**<u>पंतप्रधान आसाम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी कालपासून दोन दिवसांच्या आसाम दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात आज दुसऱ्या दिवशी पंतप्रधानांच्या हस्ते नामरूप येथे 12 हजार कोटी रुपयांच्या अमोनिया युरिया खत प्रकल्पाचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहे. त्याशिवाय ब्रह्मपुत्र नदीत जहाजातून प्रवास करत पंतप्रधान स्थानिक शाळांमधील 25 विद्यार्थ्यांशी परीक्षा पे चर्चा करणार आहेत. त्यानंतर गुवाहाटीतल्या पश्चिम बोरागाव इथं नव्याने उभारण्यात आलेल्या शहिद स्मारक क्षेत्राला भेट देणार आहेत.

पंतप्रधानांनी काल पहिल्या दिवशी गुवाहाटीत लोकप्रिय गोपीनाथ बोरदोलोई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अत्याधुनिक टर्मिनल इमारतीचं उद्घाटन केलं. जवळपास सव्वा कोटी प्रवाशांना हाताळण्याची क्षमता असलेली ही इमारत एक लाख चौरस मीटरपेक्षा अधिक परिसरात पसरलेली आहे. उद्घाटनानंतर जाहीर सभेला संबोधित करताना, केंद्र सरकार आसामच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचं सांगून गेल्या 11 वर्षात राज्यात अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्णत्वास गेले आहेत असं ते म्हणाले.

**<u>मुर्मू</u>**

करुणा, सहिष्णुता, परस्पर आदर आणि सामूहिक जबाबदारी ही मूल्य भूतकाळातील नसून, बळकट आणि सुसंवादी आधुनिक जगासाठी आवश्यक असलेला पाया आहेत. असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. तेलंगणातील हैदराबाद इथं गाचीबोवली इथं झालेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विकसित भारताच्या दृष्टीकोनासाठी आधुनिक शिक्षण आणि नैतिक शहाणीव तसंच नवोपक्रम आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा संगम असणे आवश्यक असल्याचं त्या म्हणाल्या. देशाचे भवितव्य केवळ तरुणांच्या कौशल्यांनी आणि ज्ञानाने नव्हे तर सचोटी आणि उद्देशाप्रती भावना यांनी घडणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

2047 पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी नागरी सेवांची गुणवत्ता निर्णायक भूमिका बजावेल आणि आणि राष्ट्रीय प्राधान्यक्रमांची अंमलबजावणी प्रशासकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असेल, असं प्रतिपादन काल उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. हैदराबाद इथं काल राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांच्या दोन दिवसीय परिषदेच्या समारोप सत्राला संबोधित करताना ते बोलत होते. देश विकसित भारत 2047 च्या उद्दिष्टाकडे वेगाने वाटचाल करत असताना, प्रशासनाची गुणवत्ता आणि संस्था चालवणाऱ्या प्रशासकांची गुणवत्ता निर्णायक बाब ठरणार आहे असंही ते यावेळी म्हणाले.

युपीएससीच्या प्रतिभा सेतूचे उदाहरण देताना, उपराष्ट्रपतींनी लोकसेवा आयोगाला योग्य भूमिकेसाठी योग्य प्रतिभा असलेली व्यक्ती मिळवण्यासाठी मॅपिंग आणि रोजगारक्षमतेसाठी नाविन्यपूर्ण दृष्टीकोन बाळगण्याचेही आवाहन केले.

दरम्यान, आज साजऱ्या होणाऱ्या जागतिक ध्यान दिनानिमित्त हैदराबादमध्ये होणाऱ्या ध्यानधारणा कार्यक्रमातही उपराष्ट्रपती सहभागी होणार आहेत.

**<u>शिवराज पुरस्कार</u>**

नवीन विकसित भारत जी राम जी विधेयक केवळ शेतकरी आणि कामगारांसाठीच फायदेशीर नसून ते गावांच्या सर्वांगिण विकासाशी जोडले गेल्याचं मत काल केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी व्यक्त केलं. दिल्लीत काल त्यांच्या हस्ते चौधरी चरण सिंह पुरस्कार 2025 चं वितरण झालं त्यावेळी ते बोलत होते. नवीन वर्षाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी लवचिक प्रणाली तयार करण्यासाठी मंत्रालय सूचना मागवत असल्याचं सांगून त्यांनी योजनांची प्रभावी आखणी करण्यासाठी शेतकरी, तज्ज्ञ आणि कृषी वैज्ञानिकांना एकत्र आणण्यासाठी चिंतन शिबिराचं आयोजित केली असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

**<u>डॉ-एस-जयशंकर</u>**

जागतिक पटलावर आता झपाट्याने बदल होत आहेत.सर्व स्तरावर होणाऱ्या जागतिक निकषांना पुरेसा होईल असा कौशल्य विकास, मनुष्यबळाची निर्मिती, स्वदेशी आरेखन, संशोधन, नवोन्मेष महत्वाचे असल्याचं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांनी काल पुण्यात सांगितलं.

बदलत्या काळात टिकून राहण्यासाठी मेक इन इंडियावर भर देत आपले उत्पादने परकीय बाजारपेठांमध्ये पोहोचवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, परंतू केवळ बाजारपेठ म्हणून शिल्लक रहायचं नाही तर भारताला पुढच्या टप्प्यावर नेण्याची जबाबदारी तरुणांची आहे. अशी अपेक्षा परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस शंकर यांनी काल पुण्यात सिंबायोसिस विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात बोलताना व्यक्त केली.

**<u>महाराष्ट्र निवडणूक</u>**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 23 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये नगराध्यक्ष आणि नगरसेवकांच्या 143 पदांसाठी काल शांततेत मतदान झालं. मतदानाची एकंदर आकडेवारी आज प्रसिद्ध केली जाणार आहे. दरम्यान, काल झालेल्या मतदानासह गेल्या दोन तारखेला झालेल्या मतदानाची मतमोजणी आज होणार आहे. यामतमोजणी प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून,सर्वत्र चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**<u>सन्या</u>**

न्यायिक प्रक्रिया आणि न्यायालयाचे निकाल नागरिकांना त्यांच्या स्वतःच्या भाषांमध्ये उपलब्ध होतील याची खातरजमा करण्यासाठी सर्वच संवैधानिक संस्थांनी संविधान भावनेने काम करावं असं मत भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी व्यक्त केले. उत्तर प्रदेशातील इटावा इथल्या हिंदी सेवा निधी ट्रस्टच्या 33 व्या वार्षिक कार्यक्रमाला संबोधित करताना न्यायमूर्ती बोलत होते. भाषेसंबंधातील संवैधानिक तरतुदींची देशभरात अंमलबजावणी केली जाईल अशी अपेक्षा आहे. संवैधानिक आणि कायदेशीर तरतुदींनुसार इंग्रजी ही सर्वोच्च न्यायालयाची अधिकृत भाषा असली तरीही भाषेतील दरी करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत असल्याचं न्यायमूर्तींनी सांगितलं. त्यासाठी 16 भाषांमध्ये निकालाच्या भाषांतराला सुरुवात झाली आहे. देशातील कोणताही नागरिक आपल्या राज्याच्या भाषेत प्रमाणित अनुवादित प्रत वाचू शकला पाहिजे असीही ते म्हणाले.

**<u>व्हॉटस्अप</u>**

व्हॉटस्अप वापरकर्त्यांसाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने सूचना जारी केली असून, घोस्टपेअरिंग नावाच्या सायबर मोहिमेचा वापर व्हॉटस्अप खाती हॅक करण्यासाठी केला जात असल्याचं त्यात नमूद करण्यात आलं आहे. गुन्हेगार किंवा हॅकर्स

प्रमाणीकरणाची आवश्यकता नसलेल्या पेअरिंग कोडचा वापर करून खाती हॅक करण्यासाठी डिव्हाईस लिंकिंग वैशिष्ट्याचा गैरफायदा घेत असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. वापरकर्त्यांनी कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये तसेच बाह्य संकेतस्थळावर आपला मोबाईल क्रमांक देऊ नये असे आवाहन केले आहे.

**<u>ध्यान दिवस</u>**

जागतिक पातळीवर आज दुसरा ध्यान दिवस पाळण्यात येत आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेने गेल्या वर्षी 21 डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस घोषित केला. 21 डिसेंबरपासून उत्तरायणाला प्रारंभ होत असल्याने ही तारीख निवडण्यात आली होती. न्यूयॉर्कमध्ये आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांनी संयुक्त राष्ट्र मुख्यालयात जागतिक शांतत आणि सलोख्यासाठी ध्यान सत्राचे नेतृत्व केले. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला दिलेल्या ध्यानयोगाच्या शिकवणीची आठवण करून देत, सध्याची स्थिती युद्धभूमीपेक्षा वेगळी नसल्याचे सांगून युक्रेनमध्ये लढाईत सामील असलेल्या 8 हजार सैनिकांना निराशेतून बाहेर काढण्यासाठी ध्यानधारणेतून शांतता लाभली असे ते म्हणाले.

**<u>दिल्ली प्रदुषण</u>**

दिल्ली सरकारने वायू प्रदुषण रोखण्यासाठी जीआरएपी 4 या स्तरावरची अंमलबजावणी मोहीम तीव्र केली आहे. दिल्लीचे पर्यावरण मंत्री मनजिंदर सिरसा यांनी प्रदुषणाला कारणीभूत ठरणाऱ्या उद्योग आणि बांधकाम जागांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. राज्य सरकारने दिलेल्या एका निवेदनात नियम उल्लंघन करणारे 612 उद्योग बंद करण्यात आले असून, तीन दिवसांत एक लाखाहून अधिक अधिक प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्रे जारी करण्यात आल्याचं नमूद केलं आहे.

**<u>बॅडमिंटन</u>**

बॅडमिंटनमध्ये, काल चीनमधील हांगझोऊ इथं झालेल्या BWF वर्ल्ड टूर फायनल्स 2025 या स्पर्धेत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीनं कास्यपदक मिळवलं. उपांत्य फेरीत त्यांना चीनच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला होता. या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दुसऱ्यांदा पदकाची कामगिरी केली आहे. यापूर्वी 2018 मध्ये, पीव्ही सिंधूनं महिला एकेरीत सुवर्णपदक जिंकलं होतं.

**<u>महिला क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये 5 सामन्यांच्या मालिकेतील पहिला आंतरराष्ट्रीय टी-20 सामना आज विशाखापट्टणम् इथं भारत आणि श्रीलंका संघांदरम्यान होणार आहे. हा सामना संध्याकाळी सुरू होणार आहे. हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली महिला संघ मैदानात उतरणार आहे.

**<u>क्रिकेट</u>**

19 वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान संघात अंतिम लढत होणार आहे. दुबईत सकाळी साडे दहा वाजता सामन्याला सुरुवात होईल. या दोन्ही संघांनी काल उपांत्य फेरीचे सामने जिंकून अंतिम फेरीत धडक मारली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.